## जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र.३०६३** **दि. २१/०९/२०१९**

### स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर
### हरवलेला मुलगा पालकांचे ताब्यात सुखरुप दिलेबाबत

दिनांक २०/०९/२०१९ रोजी इसम नामे अमित किशोर चव्हाण, रा.स्वारगेट पोलीस वसाहत, पुणे यांना एक लहान मुलगा पोलीस वसाहत येथे रडताना मिळुन आल्याने त्यास त्यांनी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे आणले. सदर मुलाकडे पोलीस हवालदार ३११४ माने यांनी चौकशी केली असता, सदर मुलाने त्याचे नाव अशोक पिंटु चौघुले, वय-८ वर्षे, रा.पापडेवस्ती, हडपसर, पुणे असे असल्याचे सांगितले. पोहवा माने यांनी तुकाई चौकी, हडपसर पोलीस स्टेशनचे पोहवा धायगुडे यांना सदर मुलाचे नाव व पत्ता सांगितला. त्यावर पोहवा धायगुडे यांना सदर मुलाचे नातेवाईक यांचा शोध घेऊन त्याचे नातेवाईक यांना स्वारगेट पोलीस स्टेशन येथे पाठवुन दिले. पोहवा ३११४ माने यांनी सदर मुलास स्वारगेट पोलीस स्टेशन येथे त्याची आई नामे अलका पिंटु चौघुले यांचे ताब्यात दिले. त्यावेळेस मुलाची आई अलका चौघुले यांनी पोलीसांचे आभार मानले.

